# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई – ८

## जाहिरात

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील सर्व विभागामध्ये मानद तत्वावर समुपदेशक पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यता प्राप्त विद्यापीठाची/संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची/संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A.Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदवीका (Advance Diploma in psychology) |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय/निम–शासकीय/मोठ्या खाजगी संस्थांमधील किमान २ वर्षाचा अनुभव |
| इतर अटी व शर्ती | रा.प.महामंडळाच्या विभागामध्ये आवश्यकतेनुसार समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरिता मासिक मानधन रु.४०००/– देण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणूक देण्यात येईल. सदर काळात केलेल्या कामाचा आढावा घेऊन पुढे सदर नेमणूक चालू ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा.प.महामंडळातील कर्मचाऱ्यांमध्ये समुपदेशनाद्वारे मानसिक ताणतणावाचे निवारण करणे, त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधून, अडीअडचणी समजाऊन घेऊन वैयक्तिक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे. तसेच आगारास महिन्यातून किमान ३ वेळा भेटी देणे. |
| नेमणूकीचा कालावधी | सदर नेमणूक निव्वळ मानद तत्वावर असून नेमणूकीचा कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाल विचारात घेऊन नेमणूकीचा कालावधी संबंधित विभागामार्फत वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार /हक्क अर्जदारास/ समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| अर्ज करण्याची पध्दती | वरील अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवाराने फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखित करुन स्वतःचा फोटो त्यावर चिटकवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याबाबतचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र व अनुभवाचा दाखला जोडावा. सदर अर्ज आपण ज्या विभागात समुपदेशक म्हणून काम करण्यास इच्छूक असाल त्या विभागातील रा.प.महामंडळाच्या विभाग नियंत्रकाच्या नावे विभागीय कार्यालय यांचेकडे दि.१७.०१.२०१८ पर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावा. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित विभाग नियंत्रक यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. |

टिप : रा.प.महामंडळातील सर्व विभागांचे पत्ते www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

www.fjs.co.in